जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2023
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचे खेळाडूंच्या जडणघडणीत योगदान

## माजी रणजीपटू अतुल गायकवाड; अखिल महाराष्ट्र आंतरविद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठामुळेच क्रिकेटमध्ये आणि पुढे आयुष्यातही चांगली कारकीर्द घडवू शकलो. विद्यापीठाचे खेळाडूंच्या जडणघडणीत मोलाचे योगदान आहे, असे उद्गार पुण्याच्या सीमा शुल्क व केंद्रीय जीएसटी विभागाचे अधीक्षक तथा माजी रणजीपटू अतुल गायकवाड यांनी काढले. शिवाजी विद्यापीठामध्ये अखिल महाराष्ट्र आंतरविद्यापीठ कर्मचारी टी-२० कुलगुरू चषक लेदरबॉल स्पर्धेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात अखिल महाराष्ट्र आंतरविद्यापीठ कर्मचारी क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात बोलताना अतुल गायकवाड.**

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, या स्पर्धेमध्ये पारंपरिक विद्यापीठांच्या बरोबरीनेच आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, पशू विज्ञान व मुक्त विद्यापीठेही सहभागी झाली आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या विद्यापीठांचे प्रतिनिधित्व येथे दिसते, ही नोंद घेण्यासारखी बाब आहे. कोविडच्या कालखंडानंतर प्रथमच विद्यापीठ कर्मचाऱ्यांसाठीची ही स्पर्धा भरविताना विशेष आनंद होत आहे. उद्घाटन समारंभास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले आदी प्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. शरद बनसोडे यांनी, अभिजित लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

### स्पर्धेत सहभागी संघ

मुंबई विद्यापीठ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर (अ व ब), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, महाराष्ट्र पशू व मत्स्य विद्यापीठ नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव.

14 MAR 2023 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन : प्रतीक्षा व्हनबट्टे उपक्रमशील युवा पुरस्काराने सन्मानित

# अभिजात कलेचे मूल्य कधीही बदलणार नाही : शिंदे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विज्ञानात जनुकीय बदल शक्य आहेत, परंतु अभिजात कलेचे मूल्य कधीही बदलणार नाहीत. व्यक्तीच्या आयुष्यातून कलेचे महत्त्व कधीही कमी होणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवन येथील कलादालनात रेखासम्राट टी. के. वडणगेकर यांच्या २२ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन रविवारी डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या सोहळ्यात त्यांच्या हस्ते के. आर. कुंभार गुरुशिष्य उपक्रमशील युवा कलाकार पुरस्कार जे. जे. स्कूलची विद्यार्थिनी चित्रकार प्रतीक्षा व्हनबट्टे यांना प्रदान करण्यात



कोल्हापुरात रविवारी राजर्षी शाहू स्मारक भवनात प्रतीक्षा व्हनबट्टे यांना डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्याहस्ते युवा पुरस्कार देण्यात आला. यावेळी इंद्रजीत बंदसोडे, विलास बकरे, अजेय दळवी, आलोक जत्राटकर, विजय टिपुगडे, शुभम कुंभार, मानसिंग टाकळे, मनोज दरेकर उपस्थित होते. (छाया : नसिर अत्तार)

आला. अध्यस्थानी ज्येष्ठ चित्रकार विलास बकरे होते.

डॉ. शिंदे पुढे म्हणाले, चित्रकलेतील गुरुशिष्यांची परंपरा कोल्हापुरी स्कूलने जपलेली आहे. आयुष्याच्या चित्रात मनापासून रंग भरा. शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर म्हणाले, कोल्हापुरी स्कूलने चौकटीत बंदिस्त झालेली चित्रकला बहुजनांसाठी खुली केली, हा गुरुशिष्य परंपरेचा शाहू विचार आजही सुरु आहे.

ज्येष्ठ चित्रकार डॉ. मानसिंग टाकळे म्हणाले, चित्रकारांनी आपल्या चित्रांचे आणि घटनांचे डॉक्युमेंटेशन केले पाहिजे. प्राचार्य अजेय दळवी म्हणाले, कोल्हापुरी स्कूलची परंपरा आताची पिढी जगभर पोहोचवत आहेत.

डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते यावेळी प्रफुल्ला डहाणूकर पुरस्कारप्राप्त विजय उपाध्ये, राम मेस्त्री, विजय टिपुगडे यांचाही सत्कार करण्यात आला. मनोज दरेकर यांनी सूत्रसंचालन केले. नागेश हंकारे यांनी आभार मानले. अजेय दळवी यांनी परिचय करून दिला.

प्रदर्शनात विजय टिपुगडे, प्रतीक्षा व्हनबट्टे, इंद्रजित बंदसोडे, बबन माने, गजेंद्र वाघमारे, आरिफ तांबोळी, संतोष पोवार, किशोर राठोड, नागेश हंकारे, शैलेश राऊत, पूनम राऊत, मनोज दरेकर, अभिजित कांबळे, मनीपद्म हर्षवर्धन, प्रवीण वाघमारे, विजय उपाध्ये, राहुल रेपे, विलास बकरे, शिवाजी मस्के, चेतन चौगुले यांच्या कलाकृती आहेत. यावेळी शिवाजी म्हस्के, मोहन वायचळ उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 MAR 2023 पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचे खेळाडूंच्या जडणघडणीत मोलाचे योगदान

## माजी रणजीपटू अतुल गायकवाड; आंतरविद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामुळेच क्रिकेट व पुढे आयुष्यात चांगली कारकीर्द घडवू शकलो. विद्यापीठाचे आम्हा खेळाडूंच्या जडणघडणीत मोलाचे योगदान आहे, असे कृतज्ञतापूर्ण उद्गार माजी रणजीपटू अतुल गायकवाड यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित अखिल महाराष्ट्र आंतरविद्यापीठ कर्मचारी टी-२० कुलगुरू चषक लेदरबॉल स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले उपस्थित होते.

गायकवाड म्हणाले, विद्यापीठात विद्यार्थिदशेत केलेल्या अथक सरावामुळे रणजी खेळताना कर्नाटकच्या संघाकडून खेळणाऱ्या जवागल श्रीनाथ, वेंकटेश प्रसाद या गोलंदाजांची भीती वाटली नाही. विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट मैदान विकसित करावे, अशी सूचना त्यांनी केली.

सुरुवातीला कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. उपस्थित संघांनी संचलन करीत ध्वजासह मान्यवरांना सलामी दिली. शिवाजी विद्यापीठ संघाचे कर्णधार रमेश ढोणुक्षे यांनी उपस्थित संघांना शपथ दिली. प्रास्ताविक डॉ. शरद बनसोडे यांनी केले. अभिजित लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.




कोल्हापूर : विद्यापीठात अखिल महाराष्ट्र आंतरविद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदनाने झाले. यावेळी डॉ. शरद बनसोडे, मिलिंद भोसले, अतुल गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

पुढारी

# औद्योगिक सुरक्षारक्षक देशाच्या अर्थव्यवस्थेचे रक्षक : सुरेश जोशी

## पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे औद्योगिक सुरक्षा कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षा अधिकारी औद्योगिक क्षेत्राबरोबरच देशाच्या अर्थव्यवस्थेचे रक्षक आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या योगदानाकडे पाहायला हवे, असे प्रतिपादन औद्योगिक सुरक्षा व आरोग्य खात्याचे संयुक्त संचालक सुरेश जोशी यांनी केले.

राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित औद्योगिक सुरक्षा विषयक कार्यशाळेमध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

उद्घाटन समारंभास प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते. जोशी म्हणाले, सुरक्षाविषयक नियम, निकषांचे काटेकोर पालन करून प्रत्येक विभाग अपघातमुक्त राखण्यासाठी ते दक्ष असतात. छोटीशी चूक अथवा दुर्लक्ष केवळ त्या एका उद्योगाच्याच नव्हे तर संबंधित क्षेत्रासाठी सुद्धा महाग ठरू शकते. या घटकांमुळे केवळ औद्योगिक क्षेत्र सुरक्षित राहत नाही तर देशाची अर्थव्यवस्था व समाज सुरक्षित राहतो.

कार्यशाळेत योगेश मुळे यांनी 'सुरक्षा व्यवस्थापनासाठी सक्रिय दृष्टिकोन', स्वाती जोशी यांनी 'सुरक्षा लेखापरीक्षण', आरोग्य अधिकारी डॉ. विनिता रानडे 'अपघातानंतरचे प्रथमोपचार' आणि अग्निशमन अधिकारी दस्तगीर मुल्ला यांनी 'अग्निशामक यंत्राचा वापर आणि अग्नीपासून बचाव' या अनुषंगाने मार्गदर्शन केले. मुल्ला यांनी अग्निशमन यंत्रणेच्या वापराची प्रात्यक्षिके दाखविली.

पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले. कार्यक्रमास औद्योगिक क्षेत्रातील ५० पेक्षा जास्त सुरक्षा अधिकाऱ्यांसह विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# जैन सांप्रदायाने मराठी साहित्य समृद्ध केले : पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जैन सांप्रदायाने मराठी साहित्य समृद्ध केले आणि मराठी साहित्यात मोलाची भर घातली, असे प्रतिपादन प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे आयोजित रघुनाथ स्वामी आनंदमूर्ती व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. यावेळी पाटील म्हणाले, दोन हजार वर्षांत शेकडो काव्यप्रकार जैन साहित्याने निर्माण केले. दक्षिणेतील, उत्तरेतील अनेक काव्यप्रकार मराठीत जैन कवींनी आणले. मराठी भाषेविषयी प्रेम जैन कवींनी काव्यातून प्रकट केले आहे. कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, जैन साहित्य हे वैविध्यपूर्ण असताना देखील सर्वदूर का पोहोचले नाही. याचा विचार करायला हवा. समाजापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. प्रा.डॉ. रणधीर शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. यावेळी आर. बी. पाटील, प्रदीप पाटील, प्रा. प्रमोद दोशी, प्रा. दीपक भादले, प्रा. जयवंत दळवी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 MAR 2023
सकाळ

# मुंबई, नागपूर, नांदेड, जळगाव विजयी

## आंतरविद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेस सुरुवात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठात अखिल महाराष्ट्र आंतरविद्यापीठ कर्मचारी टी-२० कुलगुरू चषक लेदरबॉल स्पर्धेचा आजपासून प्रारंभ झाला. त्यात मुंबई विद्यापीठाने सात गडी राखून नागपूरच्या महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठावर मात करीत विजयी सलामी दिली; तर नागपूर, नांदेड आणि जळगाव विद्यापीठाच्या संघांनीही प्रतिस्पर्धी संघांवर मात करीत बाजी मारली.

येथील क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलातील क्रिकेट मैदानाचे पूजन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. पुण्याच्या सीमाशुल्क व केंद्रीय जीएसटी विभागाचे अधीक्षक तथा माजी रणजीपटू अतुल गायकवाड यांच्या हस्ते पहिल्या सामन्याची नाणेफेक करण्यात आली. या सलामीच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना नागपूर विद्यापीठाने २० षटकांत सात बाद १३१ धावा केल्या. उत्तरादाखल मुंबई विद्यापीठाने सात गडी राखून १६.४ षटकांत १३३ धावा करीत विजय मिळविला. १४ धावा करणारे आणि तीन बळी घेणारे मुंबई विद्यापीठाचे विपुल खंडारे सामनावीर ठरले.

नांदेडच्या स्वा मी रामानंद तीर्थ विद्यापी ठाने लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठावर विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना लोणेरे संघाने १३.५ षटकांत सर्व बाद ९७ धावा केल्या. नांदेड संघाने प्रत्युत्तरादाखल १३.२ षटकात ६ बाद ९८ धावा केल्या. चार बळी घेणारे नांदेडचे जयराम हंबर्डे सामनावीर ठरले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ९ गडी राखून नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठावर मात केली. नाशिकच्या संघाने १८.१ षटकात १० बाद ७५ धावा केल्या. पुणे संघाने फलंदाजी करताना ७.३ षटकात अवघा एक गडी गमावून ७७ धावा केल्या. सामन्यात ३५ धावा करून गोलंदाजीतही तीन बळी मिळविण्याची अष्टपैलू कामगिरी करणारे मनिष गायकवाड सामनावीर ठरले. जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने सहा धावांनी यजमान शिवाजी विद्यापीठाला पराभवाचा धक्का दिला. जळगाव संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ बाद १८३ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल शिवाजी विद्यापीठ संघ २० षटकात ५ गड्यांच्या मोबदल्यात १७७ धावांपर्यंत मजल मारू शकला. जळगावचे जितेंद्र पाटील सामनावीर ठरले.

दरम्यान, या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी गायकवाड म्हणाले, की शिवाजी विद्यापीठामुळेच आम्ही क्रिकेटमध्ये आणि पुढे आयुष्यातही चांगली कारकीर्द घडवू शकलो. विद्यापीठाचे आम्हा खेळाडूंच्या जडणघडणीत मोलाचे योगदान आहे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, की या स्पर्धेत पारंपरिक विद्यापीठांच्या बरोबरीनेच आरोग्यविज्ञान, अभियांत्रिकी, पशुविज्ञान व मुक्त विद्यापीठेही सहभागी झाली आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या विद्यापीठांचे प्रतिनिधित्व येथे दिसते.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित संघांनी संचलन करीत ध्वजासह सलामी दिली. शिवाजी विद्यापीठ संघाचे कर्णधार रमेश ढोणुक्षे यांनी उपस्थित संघांना शपथ दिली. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले उपस्थित होते. डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. अभिजित लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी अखिल महाराष्ट्र आंतरविद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदनाने झाले. या वेळी (डावीकडून) डॉ. शरद बनसोडे, मिलिंद भोसले, माजी रणजीपटू अतुल गायकवाड, डॉ. प्रकाश गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे.**

### 'आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदान विकसित करावे'

गायकवाड म्हणाले, की शिवाजी विद्यापीठात आम्ही विद्यार्थिदशेत सरावासाठी सतत मैदानावरच असायचो. त्या वेळी येथील कर्मचारी बंधूंनी आम्हाला खूप सहकार्य केले. या अथक सरावामुळेच पुढे जवागल श्रीनाथ, वेंकटेश प्रसाद या गोलंदाजांची कधी भीतीच वाटली नाही. विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट मैदानही विकसित करावे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून 'राजर्षी शाहू परिषद'

कोल्हापूर : राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ विविध उपक्रम राबवीत आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्र आणि इतिहास अधिविभागातर्फे बुधवारी (ता. १५) आणि गुरुवारी (ता. १६) राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी परिषद होणार आहे. बुधवारी सकाळी साडेदहाला परिषदेचे उद्‌घाटन मानव्यशास्त्र सभागृहात श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे बीजभाषण होईल. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत. या परिषदेत मार्गदर्शन करण्यासाठी विविध क्षेत्रांतील नामवंत अभ्यासकांना निमंत्रित केले आहे. त्यात डॉ. यशवंतराव थोरात, सदानंद मोरे, अशोक चौसाळकर, तारा भवाळकर, लक्ष्मीकांत देशमुख, प्राचार्य आनंद मेणसे यांचा समावेश आहे. या परिषदेला सर्व शाहूप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन शाहू संशोधन केंद्राचे समन्वयक आणि ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले आहे.

14 MAR 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबई, रामानंद, फुले, चौधरी विद्यापीठाची विजयी सलामी

## महाराष्ट्र आंतरविद्यापीठ कर्मचारी क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ : यजमान शिवाजी विद्यापीठ संघ पहिल्याच सामन्यात पराभूत




**कोल्हापूर : महाराष्ट्र आंतरविद्यापीठ कर्मचारी क्रिकेट स्पर्धेच्या चषकाचे माजी रणजीपटू अतुल गायकवाड यांच्या हस्ते अनावरण झाले. सोबत मिलींद भोसले, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. शरद बनसोडे, डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील मैदानात अखिल महाराष्ट्र आंतरविद्यापीठ कर्मचारी टी–२० कुलगुरू चषक लेदरबॉल स्पर्धेला मोठ्या थाटात प्रारंभ करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करुन स्पर्धेचे उद्घाटन केले. माजी रणजीपटू अतुल गायकवाड यांच्या हस्ते चषकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष मिलींद भोसले, डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

उद्घाटनानंतर स्पर्धेतील सहभागी मुंबई विद्यापीठ (मुंबई), स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (अ व ब), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (लोणेरे) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पुणे), पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ (सोलापूर) महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ (नागपूर), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (नाशिक) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (परभणी), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (नाशिक) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव) या संघांनी संचलन करत ध्वजाला मानवंदना दिली. शिवाजी विद्यापीठ संघाचे कर्णधार रमेश ढोणुक्षे यांनी संघांना शपथ दिली.

यानंतर खेळवलेल्या पहिल्या सामन्यात मुंबई विद्यापीठने महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठला सात गडी राखून जिंकले. या सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना मत्स्यविज्ञान विद्यापीठाने २० षटकात ७ बाद १३१ धावा केल्या. प्रत्युतरादाखल खेळताना मुंबई विद्यापीठने १६.४ षटकांत ३ बाद १३३ ठोकत सामन्यात विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठला चार गडी राखून जिंकले. सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना आंबेडकर विद्यापीठाने १३.५ षटकात सर्वबाद ९७ धावा केल्या होत्या. नांदेड विद्यापीठ संघाने प्रत्युतरादाखल १३.२ षटकात ६ बाद ९८ धावा करत सामना जिंकला. तिसऱ्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला ९ गडी राखून पराभूत केले. प्रथम फलंदाजी करताना चव्हाण मुक्त विद्यापीठाने १८.१ षटकात १० बाद ७५ धावा केल्या. प्रत्युतरादाखल खेळताना फुले विद्यापीठाने ७.३ षटकात एक गडी गमावून ७७ धावा ठोकल्या. यजमान शिवाजी विद्यापीठ आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यात चौथा सामना झाला. चुरशी खेळला गेलेला हा सामना चौधरी विद्यापीठाने ६ धावांनी जिंकला. चौधरी विद्यापीठाने २० षटकांत ४ बाद १८३ धावा केल्या. मात्र प्रत्युत्तरादाखल शिवाजी विद्यापीठ संघाने २० षटकात ५ बाद १७७ धावांपर्यंत मजल मारली. शिवाजी विद्यापीठाचा ६ धावांनी पराभव झाला.

14 MAR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणसाच्या आयुष्यात कलेला प्रचंड महत्त्व

## शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन : चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विज्ञानात जनुकीय बदल शक्य आहेत, परंतु अभिजात कलेचे मूल्य कधीही बदलणार नाहीत. व्यक्तीच्या आयुष्यातून कलेचे महत्त्व कधीही कमी होणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

दसरा चौकातील शाहू स्मारक भवनमधील कलादालनात रेखासम्राट टी. के. वडणगेकर यांच्या २२ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. के. आर. कुंभार उपक्रमशील युवा कलाकार पुरस्काराने जे. जे. स्कूलची विद्यार्थिनी चित्रकार प्रतीक्षा व्हनबट्टे यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ चित्रकार विलास बकरे होते. के. आर. कुंभार यांचे नातू शुभम यावेळी उपस्थित होते. हे प्रदर्शन १८ मार्चपर्यंत सकाळी १०.३० ते रात्री ८.३० पर्यंत सर्वांना पाहण्यासाठी खुले राहणार आहे.

डॉ. शिंदे म्हणाले, चित्रकलेतील गुरुशिष्यांची परंपरा कोल्हापूरी स्कूलने जपलेली आहे. प्रत्येक व्यक्तीकडे कोणती ना कोणती कला असतेच, पण त्याचे महत्त्व जाणल्यास आयुष्यात काहीही कमी पडणार नाही. आयुष्याच्या चित्रात मनापासून रंग भरा. शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर म्हणाले, कलेशिवाय जगणं नाही. कलाकृती पाहून आनंद होत नाही, अशी एकही व्यक्ती नाही. कोल्हापूरी स्कूलने एका चौकटीत बंदिस्त झालेली चित्रकला बहुजनांसाठी खुली केली, हा गुरुशिष्य परंपरेचा शाहू विचार आजही सुरु आहे. ज्येष्ठ चित्रकार डॉ. मानसिंग टाकळे म्हणाले, स्वतःची ओळख निर्माण करण्याच्या नादात आपल्या गुरुची ओळख पुसली जाते, याचे भान ठेवले जात नाही. परंतु गुरु हीच त्याची ओळख असते. प्रत्येक क्षेत्रात गुरु असतात, त्यांची समृध्द परंपरा पुढे नेण्यासाठी खूप मोठी वाटचाल करावी लागेल.



कोल्हापूर : चित्र-शिल्प प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी उपक्रमशील युवा पुरस्काराने प्रतीक्षा व्हनबट्टे यांना सन्मानित करताना डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत अजेय दळवी, डॉ. अलोक जत्राटकर, विजय टिपुगडे, डॉ. मानसिंग टाकळे, शुभम आदी.

**■ उपक्रमशील युवा पुरस्काराने प्रतीक्षा व्हनबट्टे सन्मानित**

प्राचार्य अजेय दळवी म्हणाले, आबालाल रहेमानपासून टी. के. वडणगेकर यांच्यासह अनेक कलाकारांनी पूर्वीपासूनच कोल्हापूरचे नाव उज्ज्वल केले आहे. प्रफुल्ला डहाणूकर पुरस्कार मिळविणाऱ्या कोल्हापूरच्या विजय उपाध्ये, राम मेस्त्री तसेच मेरिट पुरस्कार मिळविणारे विजय टिपुगडे यांचाही सत्कार करण्यात आला. मनोज दरेकर यांनी सूत्रसंचालन केले. नागेश हंकारे यांनी आभार मानले. यावेळी बबन माने, गजेंद्र वाघमारे, आरिफ तांबोळी, संतोष पोवार, किशोर राठोड, शैलेश राऊत, पूनम राऊत, मनोज दरेकर, अभिजित कांबळे, मनीपद्म हर्षवर्धन, प्रवीण वाघमारे, विजय उपाध्ये, राहुल रेपे, विलास बकरे, शिवाजी मस्के, चेतन चौगुले आदींनी कलाकृती मांडल्या आहेत.

14 MAR 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अ. भा. शरीरसौष्ठव स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला उपविजेतेपद

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने उत्कृष्ट पोझिंग करत १७ गुणांसह २ सुवर्ण पदकांच्या जोरावर सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावले. स्पर्धेत देशातील ९७ विद्यापीठांमधून साडेतीनशेहून अधिक शरीरसौष्ठवपटूंनी सहभाग घेतला होता. मेंगळूर (कर्नाटक) येथील येणपोया विद्यापीठात ही स्पर्धा झाली.

या स्पर्धेच्या ६० किलो वजन गटात अवधुत निगडेने तर ७० किलो वजन गटात रोहित बोगनने प्रत्येकी १ सुवर्णपदक प्राप्त केले. तसेच ७० किलो गटात विशाल पाटीलने चौथा व ६५ किलो गटात अर्जुन मोगलेने पाचवा क्रमांक मिळवला. अवधुत हा आसुर्ले-पोर्ले येथील कॉमर्स कॉलेजचा तर रोहित हा कोवाड (ता. चंदगड) येथील आर्ट, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचा विद्यार्थी आहे. तसेच विशाल पाटील हा कळे (ता. पन्हाळा) येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाचा व अर्जुन हा हातकणंगले येथील अण्णासाहेब डांगे कॉलेजचा विद्यार्थी आहे. त्यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, शरीरसौष्ठव संघ निवड समिती चेअरमन प्रा. प्रशांत पाटील, संघ व्यवस्थापक प्रा. विक्रम यमगेकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



**अखिल भारतीय विद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेत सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावलेल्या संघासोबत प्रा. विक्रम यमगेकर.**